**साखरेचा साठा, विक्री आणि वाहतूक यांची संयुक्त तपासणी व बारकाईने देखरेख करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: जीवका-२०२६/प्र.क्र.६९/नापु-२८**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २७ ऑगस्ट, २०२६

**संदर्भ :-**

१) केंद्र शासनाच्या दि. २८.७.२०२६ व १९.०८.२०२६ रोजीच्या अधिसूचना
२) भारत सरकार, अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, साखर व वनस्पती तेल संचालनालय यांचे कार्यालयीन ज्ञापन दिनांक २४.०८.२०२६.
३) व्यापाऱ्यांकडे असलेल्या साखरेच्या साठ्याच्या प्रत्यक्ष पडताळणीसाठीची प्रमाणित कार्यपद्धती (SOP).

## शासन परिपत्रक

केंद्र शासनाने दि. २८.०७.२०२६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे साखरेबाबत साठा निर्बंध लागू केले आहेत. सदर साखर साठ्यावरील निर्बंध दि. ०१.०८.२०२६ पासून दि. ३०.११. २०२६ पर्यंत लागू असणार आहेत. त्यानुसार शासकीय संस्था अथवा सार्वजनिक वितरण प्रणाली या व्यतिरिक्त इतर कोणतेही साखर विक्रेते, वितरक साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत धारण करू शकणार नाही, तसेच कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी ४,००० क्विंटल (४०० मे.टन) पेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवणार नाही.

तसेच दि. १९.०८.२०२६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संस्थाव्यतिरिक्त इतर मोठ्या ग्राहकांसाठी साखरेबाबत साठा निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार उत्पादनासाठी, वापरासाठी किंवा कच्चा माल म्हणून प्रति महिना १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा वापर करणारा कोणताही मोठा ग्राहक १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साखरेचा साठा ठेवू शकणार नाही. सदर निर्बंध देखील दि. ३०.११.२०२६ पर्यंत लागू असणार आहेत.

तसेच, साखरेच्या साठ्याच्या प्रत्यक्ष पडताळणीसाठीची प्रमाणित कार्यपद्धती देखील केंद्र शासनाव्दारे निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने साखरेच्या साठ्याबाबत व साठा पडताळणीबाबत एकत्रित सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**अ) सर्व साखर विक्रेते व वितरक आणि मोठे ग्राहकांसाठी सूचना**

(i) सर्व साखर विक्रेते व वितरक यांनी अन्नसाठा देखरेख पोर्टलवर (Food Stock Monitoring Portal) (https://foodstock.dfpd.gov.in/) तात्काळ स्वतःची नोंदणी करावी. तसेच सदर पोर्टलवर सध्याची साठा स्थिती भरावी व त्यानंतर नियमितपणे प्रत्येक शुक्रवारी सदर माहिती अद्ययावत करावी.

(ii) सर्व संबंधितांना स्पष्टपणे कळवण्यात येत आहे की, उपरोक्त पोर्टलवर नोंदणी न केल्यास अथावा चुकीची/अपूर्ण माहीती भरल्यास , ही बाब गंभीर अनियमितता मानली जाईल आणि दोषी संस्थांवर अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

(iii) साखर विक्रेते व वितरक साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत धारण करणार नाही, तसेच कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी ४,००० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवणार नाही.

(iv) उत्पादनासाठी, वापरासाठी किंवा कच्चा माल म्हणून प्रति महिना १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा वापर करणारा कोणताही मोठा ग्राहक १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साखरेचा साठा ठेवणार नाही.

**ब) विशेष तपासणी पथके -**

त्या अनुषंगाने राज्यातील साखर कारखाने, वितरक, व्यापारी व मोठे ग्राहक यांच्या स्तरावरील साखरेचा साठा, विक्री व पाठवणी यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी व्यापक मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. सदर मोहीम दिनांक २७.०८.२०२६ (गुरूवार) पासून राबविण्यात येणार आहे.

i) सदर साठा पडताळणी करण्यासाठी पुढील प्रमाणे जिल्हास्तरावर विशेष तपासणी पथकाचे गठण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पथकातील सदस्य | |
|---|---|---|
| १ | जिल्हा पुरवठा अधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ३ | साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य या कार्यालयाचे सदर जिल्ह्याकरिता नियुक्त असलेले प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | निरिक्षक, वैधमापन शास्त्र | सदस्य |
| ५ | पोलीस अधिक्षक/ पोलीस निरिक्षक दर्जाचे अधिकारी | सदस्य |

II) मुंबई व ठाणे परिमंडळाकरिता नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांच्या स्तरावर विशेष तपासणी पथके गठीत करावी.

III) या व्यतिरिक्त जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय दक्षता पथकांमार्फत देखील साठा तपासणी करण्यात यावी.

**क) साखरेच्या साठा मर्यादेची पडताळणी करण्याकरिता कार्यपद्धती.**

i. साखर (नियंत्रण) आदेश, २०२५ तसेच केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार लागू असलेल्या साठा मर्यादेचे पालन होत आहे किंवा कसे, याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात यावी.

ii. व्यापाऱ्यांकडे कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी ४,००० क्विंटल (४०० मेट्रिक टन) पेक्षा अधिक साखरेचा साठा नाही, याची प्रत्यक्ष साठा मोजणीद्वारे खात्री करण्यात यावी.

iii. साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साठा धारण केलेला नाही, याची संबंधित खरेदी पावत्या, गेट पास, वाहतूक कागदपत्रे व इतर उपलब्ध अभिलेखांच्या आधारे पडताळणी करण्यात यावी.

iv. तपासणी पथकाने संबंधित व्यापाऱ्याच्या नोंदणीकृत व्यवसायस्थळास/गोदामास भेट देऊन तेथे उपलब्ध असलेल्या साखरेच्या प्रत्यक्ष साठ्याची पडताळणी करावी.

v. प्रत्यक्ष साठ्याची पोत्यांची मोजणी करून नोंद घेण्यात यावी व सदर साठ्याची व्यापाऱ्याने ठेवलेल्या साठा/खरेदी/विक्री नोंदवहीतील नोंदींशी पडताळणी करण्यात यावी.

vi. प्रत्यक्ष साठा व अन्नसाठा देखरेख पोर्टलवर व्यापाऱ्याने घोषित केलेला साठा यामध्ये तफावत आहे किंवा कसे, याची तपासणी करण्यात यावी.

vii. संबंधित व्यापाऱ्याने अन्नसाठा देखरेख पोर्टलवर नोंदणी केली आहे किंवा कसे तसेच विहित कालावधीनुसार साठ्याची स्थिती अद्ययावत केली आहे किंवा कसे, याचीही पडताळणी करण्यात यावी.

viii. उत्पादनासाठी, वापरासाठी किंवा कच्चा माल म्हणून प्रति महिना १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा वापर करणारा कोणताही मोठ्या ग्राहकाने साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साठा धारण केलेला नाही, याची संबंधित खरेदी पावत्या व इतर उपलब्ध अभिलेखांच्या आधारे पडताळणी करण्यात यावी.

ix. प्रत्येक साखर कारखान्याने मोठ्या ग्राहकांना (थेट किंवा डीलर्सद्वारे) विकलेल्या साखरेच्या मासिक प्रमाणाची पडताळणी करावी.

x. मोठ्या ग्राहकांची तपासणी साखरेच्या वापराचे निर्धारण विक्रेते आणि/किंवा खरेदीदारांनी साखरेसाठी लागू असलेल्या सुसंगत 'Harmonised System of Nomenclature' (HSN) कोडचा वापर करून दाखल केलेल्या GST (वस्तू आणि सेवा कर) रिटर्नच्या आधारे करावी.

xi. अभिलेख व कागदपत्रांची तपासणी -

तपासणीच्या वेळी संबंधित व्यापाऱ्याकडील पुढील अभिलेख/कागदपत्रांची उपलब्धतेनुसार तपासणी करण्यात यावी :-

साठा नोंदवही; खरेदी-विक्री नोंदवही; खरेदी पावत्या/चलने; गेट पास; वाहतूक व पाठवणीसंबंधी कागदपत्रे; अन्नसाठा देखरेख पोर्टलवरील घोषित साठ्याचा तपशील; लागू असलेल्या सूट/अपवादासंबंधीची अधिकृत कागदपत्रे इ.

**ड). तफावत आढळल्यास करावयाची कार्यवाही**

I. घोषित साठा व प्रत्यक्ष उपलब्ध साठा यामध्ये तफावत आढळल्यास त्याची स्पष्ट नोंद तपासणी अहवालात करण्यात यावी.

II. साखरेचा प्रत्यक्ष साठा ४,००० क्विंटलपेक्षा अधिक असल्याचे अथवा साखरेचा साठा ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी धारण केल्याचे आढळल्यास, तसेच, कोणत्याही मोठ्या ग्राहकाकडे उत्पादनासाठी, वापरासाठी किंवा कच्चा माल म्हणून प्रति महिना १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा वापर करणारा साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी आढळल्यास सदर बाबीची विशेष नोंद करण्यात यावी.

III. अशा प्रकरणांमध्ये साठ्याच्या ढिगाऱ्यांची /थप्पीची छायाचित्रे, संबंधित नोंदवह्या, कागदपत्रे व इतर आवश्यक पुरावे संकलित करून तपासणी अहवालासोबत जोडण्यात यावेत.

IV. प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी पूर्ण झाल्यानंतर विहित नमुन्यात पडताळणी अहवाल (परिशिष्ट-अ) तयार करण्यात यावा.

V. संयुक्त तपासणीदरम्यान आढळून आलेल्या तफावती, अनियमितता अथवा विहित साठा मर्यादेचे उल्लंघन याबाबतची माहिती संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून, जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व प्रचलित नियमांनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोडल अधिकाऱ्यांमार्फत शासनास सादर करावा.

सदर परिपत्रक दि. ३०.११.२०२६ रोजीपर्यंत अथवा सदर परिपत्रक अधिक्रमित होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लागू राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८२७१११११०८३४०६ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
Date: 2026.08.27 11:12:59 +05'30'

**( अशोक आत्राम )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
४. सचिव (अनापुवग्रासं), मंत्रालय,मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
६. प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव/महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

८. सर्व विभागीय आयुक्त
९. साखर आयुक्त, पुणे
१०.सर्व पोलीस आयुक्त
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सर्व पोलीस अधिक्षक
१३.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
१४.नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई
१५.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१६.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१७.निवडनस्ती (नापु-२८)

*****

परिशिष्ट अ

| वितरक/ विक्रेता यांचे नाव व पत्रा | अन्न सहाय्यता पोर्टलवर नोंदणी केली आहे किंवा नाही | अन्न सहाय्यता पोर्टलवर नोंदणी केल्याबाबतचा तपशिल | साठवणूक केंद्राचा तपशिल | अन्न सहाय्यता पोर्टलवर नोंदविण्यात आलेला साठा | साठा नोंदवहीवर नमूद केलेला साठा | पडताळणी दरम्यान प्रत्यक्ष आढळलेला साठा | खरेदी पावत्या/ चलने इ कागदपत्रांचा तपशिल | साठ्यामध्ये तफावत आढळल्यास त्याबाबता तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

- साठ्याच्या ढिगाऱ्यांची/थप्पीची छायाचित्रे, संबंधित नोंदवह्या, कागदपत्रे व इतर आवश्यक पुरावे

संबंधीत तपासणी पथकातील अधिकारी यांचे नाव व पदनामासह स्वाक्षरी

संबंधीत विक्रेता/ व्यापारी यांचे नावं व स्वाक्षरी